आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

६ जून २०२४ - गुरुवार

भाजपा अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली इथं केंद्रीय मंत्री आणि पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांची बैठक सुरु आहे. एनडीएच्या नेत्यांनी काल आपले नेते म्हणून नरेंद्र मोदी यांची एकमतानं निवड केली होती. त्यानंतर ही बैठक होत आहे. गृह मंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्यासह इतर ज्येष्ठ नेते नड्डा यांच्या निवासस्थानी आयोजित बैठकीला उपस्थित आहेत.

एनडीएच्या संसदीय पक्षाची बैठक उद्या नवी दिल्ली इथं होणार आहे. एनडीएच्या घटक पक्षांचे नव्यानं निवड झालेले खासदार या बैठकीला उपस्थित राहतील अशी शक्यता आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीतल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या कामगिराचा आधावा घेण्यासाठी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी आज मुंबईत पक्षाच्या वरीष्ठ नेत्यांची बैठक घेतली. सर्व ४८ मतदारसंघाबाबत या बैठकीत चर्चा झाल्याचं राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी बैठकीनंतर बातमीदारांना सांगितलं. राष्ट्रवादी काँग्रेसचे काही आमदार शरद पवार यांच्या संपर्कात असल्याचं वृत्त त्यांनी फेटाळून लावलं. पक्षाच्या सर्व आमदारांचा अजित पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास असून सर्व आमदार बोलावलेल्या बैठकीला येणार आहेत. येत्या १० तारखेला मुंबईत पक्षाचा वर्धापनदिन षण्मुखानंद सभागृहात साजरा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला राज्यभरातले सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते येणार आहेत, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक सोहळ्याचा साडेतीनशेवा वर्धापन दिन आज साजरा होत आहे. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी यानिमित्त विविध

कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून विविध मान्यवरांनी छत्रपतींना अभिवादन केलं आहे. राज्यपाल रमेश बैस यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना आदरांजली वाहिली असून राज्यातही ठिकठिकाणी शिवराज्याभिषेक सोहळा साजरा होत आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसंच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी समाजमाध्यमावर महाराजांना मानवंदना दिली आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्याला साडे-तीनशे वर्ष पूर्ण झाल्या निमित्त आज किल्ले रायगडावर आयोजित सोहळ्यात सहभागी होण्यासाठी देशभरातून हजारो शिवभक्त रायगडावर दाखल झाले आहेत. संपूर्ण रायगड फुलांनी सजविण्यात आला आहे.

आज सकाळी ढोल ताशांच्या गजरात शिवरायांना छत्रपती संभाजी राजे यांच्या उपस्थितीत मानवंदना देण्यात आली.. यावेळी मर्दानी खेळ, शाहिरी नजराणा, पालखी सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं होतं. सारा रायगड परिसर जय जिजाऊ जय शिवाजी, शिवाजी महाराज की जय च्या घोषणांनी दणाणून गेला आहे.

कोल्हापूर इथं छत्रपती शाहू महाराज यांच्या उपस्थितीत शिवराज्याभिषेकाचा साडेतीनशेवा वर्धापन दिन साजरा करम्यात आला. हिंगोली, वाशीम, आणि इतर जिल्ह्यात आज विविध संघटनांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केलं. तसंच जिजाऊंना मानवंदना दिली. नवी दिल्लीतल्या राष्ट्रीय कलादालनातही विशेष प्रदर्शन भरवण्यात आलं आहे.

**<><><><><>**

कृषी आयुक्तालयामधे खत आणि कीटकनाशक खरेदीचा मोठा घोटाळा समोर आला असून, या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी आपण विधानसभेत करणार असल्याचं विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. नॅनो डीएपी आणि नॅनो युरीया, मेटाल्डीहाईड या कीटकनाशकांची तिप्पट दरानं खरेदी सुरू असल्याची माहिती आपल्याकडे असल्याचं त्यांनी यात म्हटलं आहे.

**<><><><>**

महाराष्ट्रातल्या गडचिरोली जिल्ह्यात काल पोलीस आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक झाली. यात कोणीही जखमी झालं नाही. पोलिसांनी यावेळी स्फोटके, वायर, बॅटरी, पुस्तकं आणि अन्य साहित्य जप्त केलं आहे. हे नक्षलवादी तेंदूपत्ता कंत्राटदारांकडून खंडणी वसूल करण्यासाठी आले होते, असं पोलिसांनी सांगितलं.

**<><><><>**

नैऋत्य मोसमी पाऊस आज महाराष्ट्रात दाखल झाला. तळ कोकणात रत्नागिरी, तसंच सोलापूर मधे मोसमी पावसाचा प्रवेश झाल्याचं हवामानशास्त्र विभागाचे वरिष्ठ वैज्ञानिक कृष्णानंद होसाळीकर यांनी म्हटलं आहे. रत्नागिरी जिल्ह्यात दोन दिवसांपासून पावसाची संततधार आहे. गेल्या २४ तासांत लांजा इथं सर्वाधिक १९ मिलिमीटर पावसाची, तर दापोलीत साडे १६ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. रत्नागिरी तालुक्यात आजही सकाळी दहा वाजल्यानंतर काही वेळ पावसाची संततधार सुरू होती.

**<><><><>**

आयसीसी टी-20 विश्व चषक स्पर्धेत न्यूयॉर्कमध्ये काल रात्री झालेल्या सामन्यात आयर्लंडचा ८ गडी राखून पराभव करुन, भारतानं विजयी सलामी दिली.

प्रथम फलंदाजी करताना आयर्लंडचा संघ १६ षटकांत ९६ धावा करु शकला. भारतानं तेराव्या षटकात दोन गड्यांच्या मोबदल्यात हे लक्ष्य पार केलं. यानंतर भारताचा सामना पाकिस्तानबरोबर येत्या रविवारी ९ जूनला तर सह-आयोजक अमेरिकेबरोबर येत्या १२ जूनला होणार आहे.

//<><><><><>//